आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दु १.३० वाजता

९ जुलै २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- तिसऱ्या कार्यकाळात तिप्पट वेगानं काम करून भारतीय अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचा प्रधानमंत्र्यांचा रशिया दौऱ्यात पुनरुच्चार/ २२ व्या भारत रशिया शिखर परिषदेत आज सहभागी होणार

- जम्मू काश्मीरमधे कठुआ जिल्ह्यात दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दलांची व्यापक शोधमोहीम सुरू

- महाराष्ट्रात पॅथॉलोजी लॅबवर नियंत्रणासाठी वेगळा कायदा करण्याचं सरकारचं विधानसभेत आश्वासन

- आसाममध्ये पूरबळींची संख्या ७२वर, उत्तरप्रदेशात २०० गावात पूरस्थिती / मुंबईत पावसाची विश्रांती, मात्र उर्वरित कोकणात पावसाचा जोर कायम

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकसाठी भारताच्या पथकाचं नेतृत्व गगन नारंगकडे

**<><><><><><>**

तिसऱ्या कार्यकाळात तिप्पट वेगानं काम करून भारतीय अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या क्रमांकावर न्यायचं आहे, याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केला. ते मॉस्कोमध्ये भारतीय समुदायाशी संवाद साधत होते. आज आपला देश आत्मविश्वासानं उभा आहे, ही अतिशय महत्वपूर्ण बाब असल्याचं ते म्हणाले. जगाला भारताकडून अनेक अपेक्षा आहेत आणि त्या पूर्ण करण्याची एकही संधी आपण सोडणार नाही, असं त्यांनी सांगितलं. भारत आणि रशिया यांच्यातल्या मैत्रीपूर्ण संबंधाबाबत त्यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांचं कौतुक केलं.

प्रधानमंत्री मोदी सध्या रशियाच्या दौऱ्यावर असून आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यासह ते उभय देशांदरम्यानच्या बाविसाव्या वार्षिक शिखर परिषदेचं सहअध्यक्षपद भूषवणार आहेत. या परिषदेत संरक्षण, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा सहकार्य, शिक्षण यांच्यासह विविध द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा होईल. विविध जागतिक आणि क्षेत्रीय मुद्द्यांवरही त्यांच्यात चर्चा होणार आहे. ब्रिक्स, शांघाय सहकार्य संघटना, जी-ट्वेंटी आणि संयुक्त राष्ट्रांमधल्या मुद्द्यांवरही ते विचारविनिमय करतील.

प्रधानमंत्री मोदी काल संध्याकाळी मॉस्कोत पोहोचले. रशियाचे उपप्रधानमंत्री डेनिस मंतुरोव्ह यांनी त्यांचं स्वागत केलं. काल संध्याकाळी मोदी यांच्या स्वागतानिमित्त रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी मेजवानीचं आयोजन केलं होतं.
त्यानंतर आज उशिराने प्रधानमंत्री मोदी ऑस्ट्रियाला जाणार आहेत. हा त्यांचा पहिलाच ऑस्ट्रिया दौरा आहे.

**<><><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या कठुआ जिल्ह्यात दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्याची गरज आहे, अशा शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. हुतात्म्यांच्या कुटुंबियांप्रति त्यांनी सहवेदना व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या कठुआ जिल्ह्यात काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर कठुआ जिल्ह्यातल्या माचेडी भागात संरक्षण दलांनी शोधमोहीम सुरू केली आहे. हेलिकॉप्टर, बॉम्बशोधक श्वान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं ही मोहीम राबवली जात आहे. परकीय देशातून आलेल्या तीन ते चार दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याचा अंदाज आहे. २८ एप्रिल रोजी बसंतगढ

इथं ग्राम रक्षकाची हत्या करणाऱ्या गटाचाच ते भाग असल्याचीही शक्यता वर्तवली जात आहे.

लष्कराच्या पाच जवानांना वीरमरण आल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दुःख व्यक्त केलं. या कठीण काळात संपूर्ण देश जवानांच्या कुटुंबीयांच्या मागे उभा आहे, असं ते आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाले. दहशतवादविरोधी कारवाई सुरू करण्यात आली असून लष्करी जवान या प्रदेशात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करत आहेत, असं त्यांनी सांगितलं. या हल्ल्यात जखमी झालेल्यांनी लवकर बरं होण्याची कामनाही त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये पूँछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ पाकिस्तानी ड्रोन पाडण्यासाठी लष्करानं काल रात्री गोळीबार केला. एक हजार मीटर उंचीवर तरंगणारे ड्रोन पाडण्यासाठी जवानांनी काल रात्री सव्वा नऊच्या सुमारास बंदुकीच्या पाच फैरी झाडल्या. पण, हे ड्रोन पाकिस्तानी हद्दीत परतण्यात यशस्वी झाले, अशी माहिती आकाशवाणीच्या वार्ताहराने दिली. हे ड्रोन पुन्हा एकदा भारतीय हद्दीत आल्यानंतर लष्कराने पुन्हा बंदुकीच्या दोन फैरी झाडल्या, मात्र ड्रोन पुन्हा एकदा पाकिस्तानी हद्दीत परतले. या ड्रोनद्वारे कोणती शस्त्रं किंवा अंमली पदार्थ टाकली आहेत का हे पाहण्यासाठी आज सकाळी लष्कराने शोधमोहीम राबवली. या परिसरात कुठेही अशी वस्तू आढळून आली तर त्याची माहिती देणाऱ्याला तीन लाख रुपये इनाम जम्मू काश्मीर पोलिसांनी जाहीर केला आहे.

**<><><><><>**

पेट्रोलियम वितरण कंपन्या बोगस ग्राहक हुडकून काढण्यासाठी ई - के वाय सी मोहीम गेल्या आठ महिन्यांपासून राबवत आहेत , असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी सांगितलं. एल पी जी गॅस सिलिंडरचं वितरण करतेवेळी मोबाईल ॲपचा वापर करून आधार क्रमांकासह ग्राहकांचे इतर

तपशील तपासले जातात, यावेळी ग्राहकांना ओ टी पी देखील पाठवला जातो, असं त्यांनी स्पष्ट केलं. या पडताळणी प्रक्रियेचा सामान्य ग्राहकांना त्रास होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ते बोलत होते. ग्राहकांना कोणताही त्रास होऊ नये यादृष्टीनं तेल वितरण कंपन्यांनी या संदर्भात एक स्पष्टीकरणही प्रसारित केलं असल्याचं त्यांनी सांगितलं .

<><><><><><>

राज्यात बनावट पॅथॉलोजी लॅबवर नियंत्रण ठेवून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा आणला जाईल, अशी माहिती प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत दिली. सुनील राणे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते. या स्वतंत्र कायद्यात दरावर नियंत्रण, कलेक्शन सेंटर नोंदणी, फौजदारी कारवाई या संबंधी देखील तरतूद असेल. कायदा आणण्यासाठी विलंब झाला तर सध्याच्या नर्सिंग कायद्यात सुधारणा करून कारवाई केली जाईल, असंही मंत्री सामंत म्हणाले. मुंबईतल्या बेस्ट बस आणि इतर सुट्या भागांची भंगार विक्रीची चौकशी उच्च स्तरीय समिती नेमून केली जाईल अशी घोषणा देखील सामंत यांनी केली.

<><><><><><>

विधानपरिषदेच्या नियमित सत्रात आज सभागृहाच्या नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी झाला. मुंबई पदवीधर मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार अनिल परब आणि नाशिक शिक्षक मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार किशोर दराडे यांना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आमदारकीची शपथ दिली.

राज्यात नवीन महसूल कार्यालय निर्मिती आणि महसूल विभागातील अन्य विषयांबाबत शिफारसी करण्यासाठी सेवानिवृत्त सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचा अहवाल येत्या २५ तारखेला प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल

अशी माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जनतेकडून देणगी स्वीकारण्याची राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षानं केलेली मागणी केंद्रीय निवडणूक आयोगानं मान्य केली आहे. पक्षाच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल निवडणूक आयोगाची भेट घेतली. त्यानंतर त्या बोलत होत्या.

**<><><><><>**

आसाममध्ये पुरामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ७२ वर गेली आहे. राज्यात २७ जिल्ह्यांमधल्या २२ लाख नागरिकांना अजूनही पुराचा धोका आहे. पुरामुळे ४९ हजार हेक्टर क्षेत्रातल्या पिकांचं नुकसान झालं आहे. १२७ रस्ते आणि २ पुलांचंही नुकसान झालं आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या जवानांनी काल २१८ जणांची सुटका केली. ब्रह्मपुत्रा, आणि बराक, तसंच त्यांच्या उपनद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. राज्य सरकारनं २४५ मदत शिबिरं आणि २९८ मदत वाटप केंद्र स्थापन केली आहेत. सध्या ५३ हजारांपेक्षा जास्त नागरिक मदत शिबिरांमध्ये आहेत.

उत्तर प्रदेशमध्ये सहा जिल्ह्यांतल्या दोनशे गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. श्रावस्ती इथल्या ४४ हजार, तर लखिमपूर खिरीमधल्या ३० हजार नागरिकांना पुराचा फटका बसला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीवर काल जोरदार हजेरी लावणाऱ्या पावसानं आज राजधानी मुंबई आणि उपनगर क्षेत्रात काहीशी विश्रांती घेतली आहे. मात्र

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यात आजही जोरदार पाऊस होत आहे. वेधशाळेने जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केल्याच्या पार्श्वभूमीवर **मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी** तसंच **पुणे** जिल्ह्यातल्या शाळा -महाविद्यालयांना आजही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. नागरिकांनी विशेषतः दरड प्रवण क्षेत्रात किंवा नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, आपणहून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावं, धबधबे, धरणक्षेत्र, घाट परिसर, समुद्रकिनारे, नदीतीर अशा ठिकाणी पर्यटनाला जाऊ नये असं आवाहन प्रशासनाने केलं आहे. आजच्या दिवसाकरता वेधशाळेनं **रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे** आणि **सातारा** या जिल्ह्यांना रेड अलर्ट दिला आहे.

**<><><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात भारताच्या पथकाचं नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेता नेमबाज गगन नारंग करणार आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं नारंग याची निवड शेफ डी मिशन (सीडीएम) म्हणून केली आहे. यापूर्वी मुष्टियोद्धा मेरी कोम या पथकाचं नेतृत्व करत होत्या. मात्र त्यांच्या राजीनाम्यानंतर या पथकाचं नेतृत्व नारंग करतील, अशी माहिती भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी दिली. या पदावर निवड झालेल्या खेळाडूवर पथकातील खेळाडूंची काळजी घेणं आणि आयोजन समितीशी समन्वय साधण्याची जबाबदारी असते. पी व्ही सिंधू ही पथकाची महिला ध्वजवाहक असेल आणि टेबल टेनिसपटू अचंता शरत कमल तिच्या सोबत असेल.

**//<><><><><><>//**